समाचार वाणी
ख़बर जो करें असर !

नाशिक | Thursday, 24 September 2026

# Sanjay Raut Claim: ‘सहा खासदारांशी मध्यरात्री झाली कोट्यवधींची मांडवली’, संजय राऊतांचा शिंदे गटावर गंभीर आरोप

Sanket Morankar
Published on 19 Jun 2026




शिवसेनेच्या 60 व्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाला मोठा राजकीय धक्का बसला आहे. पक्षातील सहा खासदारांनी बंडाची भूमिका घेतल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना शिवसेना (ठाकरे गट) नेते **संजय राऊत** यांनी शिंदे गटावर गंभीर आरोप करत मोठा गौप्यस्फोट केला आहे.

राऊत यांच्या मते, बंडखोर खासदार आणि शिंदे गटामध्ये **मध्यरात्री मंत्रिपद आणि कोट्यवधी रुपयांच्या व्यवहारावर मांडवली** झाली असून त्यासाठी मोठी आर्थिक देवाणघेवाण करण्यात आल्याचा त्यांनी दावा केला आहे.

सहा खासदारांच्या बंडामुळे ठाकरे गटात खळबळ

शिवसेनेच्या हिरक महोत्सवी वर्षातच ठाकरे गटातील सहा खासदारांनी स्वतंत्र भूमिका घेतल्याने पक्षात पुन्हा एकदा फूट पडल्याची चर्चा सुरू झाली आहे. पक्षाने व्हिप जारी करूनही संबंधित खासदार संसदीय दलाच्या बैठकीला अनुपस्थित राहिले. त्यानंतर त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

दरम्यान, हे खासदार शिंदे गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांनी राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.

‘मंत्रिपदावरून वाद झाला, मग झाली मांडवली’

माध्यमांशी बोलताना संजय राऊत यांनी दावा केला की बंडखोर खासदारांमध्ये मंत्रिपदावरून मतभेद निर्माण झाले होते.

त्यांच्या म्हणण्यानुसार, अखेर असा तोडगा काढण्यात आला की **फक्त एका खासदाराला मंत्रिपद दिले जाईल**, तर उर्वरित खासदारांना मंत्रिपदाऐवजी **प्रत्येकी आणखी 25 कोटी रुपये देण्याचे आश्वासन** देण्यात आले.

राऊत यांनी आरोप केला की ही संपूर्ण मांडवली बुधवारी मध्यरात्री झाली.

‘हे बंड नाही, हा व्यवहार आहे’

संजय राऊत यांनी बंडखोर खासदारांवर जोरदार टीका करत हे कोणतेही वैचारिक बंड नसल्याचे म्हटले.

त्यांनी भगतसिंग आणि राजगुरू यांच्या बलिदानाचा उल्लेख करत, “क्रांती आणि बंडाची तुलना पैशासाठी पक्ष बदलणाऱ्यांशी होऊ शकत नाही,” असे सांगितले. त्यांच्या मते, हे लोक स्वतःला विकण्यासाठी बाजारात उभे राहिले आणि बोली लागल्यानंतर पक्ष सोडून गेले.

‘राजीनामा द्या आणि जनतेसमोर जा’

राऊत यांनी बंडखोर खासदारांना थेट आव्हान देत म्हटले की, जर त्यांच्यात नैतिकता असेल तर त्यांनी तत्काळ खासदारकीचा राजीनामा द्यावा आणि पुन्हा जनतेचा कौल घ्यावा.

त्यांनी असा आरोपही केला की संबंधित खासदार सध्या पोलीस संरक्षणात फिरत असून आपल्या मतदारसंघात जाण्याची त्यांची हिंमत होत नाही.

शिंदे गटाकडून अद्याप प्रतिक्रिया नाही

संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांमुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. मात्र या आरोपांवर **शिंदे गटातील नेत्यांकडून किंवा संबंधित बंडखोर खासदारांकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.**

दरम्यान, शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात या राजकीय घडामोडींचे पडसाद उमटण्याची शक्यता असून महाराष्ट्रातील पुढील राजकीय समीकरणांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

DISCLAIMER: the views/contents expressed/presented herein, within this advertorial and promotional feature are the sole and exclusive responsibility of individual clients/expert/their authorised representative/Sanket Morankar, to which effect, publication house/its representative/affiliates are not responsible/liable whatsover.